हॅलो नांदेड. www.lokmat.com
लोकमत
छत्रपती संभाजीनगर, बुधवार, दि. २८ मे २

दि. 28/05/25

# डिजिटल सेवा देण्यावर पोलिस दलाचा अधिक भर

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तीन सेवांचा शुभारंभ

नांदेड : नागरिकांशी संवाद साधणे अधिक सुलभ व्हावे व कमी वेळात त्यांना पोलिस सेवांचा लाभ घेता यावा, यासाठी नांदेड पोलिस दलामध्ये 'मिशन सहयोग'अंतर्गत डिजिटल सेवा मजबूत करण्यावर भर देण्यात आला आहे. यापैकी सोमवार (दि. २६) रोजी तीन डिजिटल सेवांचा मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते शुभारंभ करण्यात आला.

पोलिस प्रशासन आणि समाज यांचा एक घनिष्ट संबंध असतो. पोलिसांच्या कामकाज पध्दतीचा परिणाम समाजावर पडत असतो. पोलिस प्रशासन २४ तास समाजासाठी कार्यरत असते. अशावेळी दैनंदिन कामकाजाशिवाय सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून या बाबतीत पोलिस प्रशासन युवक युवती, महिला, वृद्ध यांना सोबत घेऊन कार्य करणार आहे. यात "मिशन सहयोग'अंतर्गत वेगवेगळे ८ उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यापैकी एक "मिशन समाधान" हे एक असून, या माध्यमातून पोलिस दलाचा नागरिकांशी संवाद वाढविण्यात येत आहे. मुख्यमंत्री यांच्या शंभर दिवसांच्या कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत जिल्हा पोलिस दलाकडून "मिशन समाधान" अंतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व्हॉटसअॅप चॅटबॉट, ऑनलाइन तक्रार निवारण प्रणाली व नांदेड पोलिस व्हॉट्सअॅप चॅनेल या तीन सेवांचा शुभारंभ करण्यात आला. या डिजिटल उपक्रमाचा उद्देश नागरिकांसाठी पोलिस सेवा प्रभावी व्हावी, त्यांना संवाद साधणे सुलभ व्हावे व नागरिकांना कुठूनही घरबसल्या ऑनलाइन तक्रार करता यावी, हा आहे. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे, खासदार अशोकराव चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, सायबरचे पोउपनि. मारोती चव्हाण उपस्थित होते.




## ८ उपक्रम

मिशन सहयोग अंतर्गत जिल्हा पोलिस दलाकडून मिशन उडान, ऑपरेशन वारसा जतन, नांदेड पोलिस लिग, मिशन निर्भया, मिशन समाधान, मिशन निर्धार, ऑपरेशन बीट कनेक्ट हे उपक्रम घेण्यात येणार आहेत.

# क्विक Update



## प्रतिज्ञा देशमुख राज्यस्तरीय पुरस्काराने सम्मानित

**नांदेड :** श्री स्वामी सेवा मार्गातर्फे विदर्भ सत्संग सोहळा समिती आयोजित गुरुमाऊली यांच्या उपस्थितीत सिंदखेड राजा येथे पार पडलेल्या महिला सक्षमीकरण मेळाव्यात प्रतिज्ञा बालासाहेब शिंदे यांना राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी गुरुमाउली मोरे, आबासाहेब मोरे, केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे, केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आमदार मनोज कायंदे, शिवराज शेटे आदींची उपस्थिती होती.

## पथदिवे बंद; वाहनधारक त्रस्त

**नांदेड :** शहरातील तरोडानाका ते